# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## विषय – दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात (हंगामी) पद भरणे बाबत...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नि. बहिणाबाई चौधरी प्राणीसंग्रहालयाचे ठिकाणी दर माहे एकत्रित मानधनावर खाली नमुद केलेल्या पदांसाठी हंगामी तात्पुरत्या स्वरुपात ६ महिने कालावधी करीता मुलाखत पध्दतीने नेमणुक करावयाची आहे. सदर पदांचे पदनाम, पदसंख्या, शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि अटी खालीलप्रमाणे

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | शैक्षणिक अर्हता / अनुभव |
|---|---|---|---|
| १) | ऍनिमल किपर | ०३ | १. शैक्षणिक अर्हता – किमान १० वी उत्तीर्ण, तथापि १२वी उत्तीर्ण उमेदवारास प्राधान्य.<br>२. मान्यता प्राप्त विद्यापीठाकडील 'पशुधन पर्यवेक्षक पदविका' (LSS) उत्तीर्ण असल्यास प्राधान्य.<br>३. भारतातील मान्यताप्राप्त प्राणिसंग्रहालयात 'ऍनिमल किपर' अथवा सहा. ऍनिमल किपर पदावर काम केल्याचा अनुभव / भारतातील सर्पसंग्रह असणाऱ्या मान्यताप्राप्त शासकिय संस्थेमध्ये तांत्रिक पदावर काम केल्याचा किमान १ वर्षाचा अनुभव. |

१) मानधनावरील नेमणुका पुर्णपणे तात्पुरत्या/ हंगामी स्वरुपाच्या आहेत. त्यामुळे अर्जदारास कोणत्याही कायम नेमणुकीचा हक्क राहणार नाही.

२) ज्या दिवशी म.न.पास सदर पदाची आवश्यकता नसेल त्यावेळी कोणत्याही नोटिशीशिवाय त्यांच्या मानधनावरील सेवा संपुष्टात आणण्यात येतील.

३) मुलाखतीस येण्याकरीता उमेदवारास कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता दिला जाणार नाही.

४) उपरोक्त पदासाठी प्रतिमहा एकत्रित मानधन र. रु. १५,१००/- देय असेल.

५) इच्छुक उमेदवारांनी हस्तलिखीत अर्जासह बायो-डेटा, शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र व अनुभवाबाबतच्या आवश्यक त्या साक्षांकीत केलेल्या प्रती उदा. गुणपत्रिका (मार्कशिट), सर्टिफिकेट, फोटो, इत्यादी जाहीरात प्रथम प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ७ दिवसांत **पशुवैद्यकीय अधिकारी यांचे कार्यालय, पशुवैद्यकीय विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, कै. नारायण मेधाजी लोखंडे सभागृह, गांधीनगर, पिंपरी, पुणे – ४११०१८** येथे समक्ष अथवा पोस्टाने सादर करावेत.

६) उशिरा प्राप्त/ अपूर्ण अर्ज तथा अर्जा सोबत सादर केलेला अनुभव खोटा असल्याचे निदर्शनास आलेस तो उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

७) प्राप्त अर्जांची छाननी होऊन, मुलाखतीस पात्र उमेदवारांची यादी महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. यासंदर्भात कोणताही समक्ष पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.

८) पात्र उमेदवारांनी मुलाखतीसाठी उपस्थित राहतांना शैक्षणिक अर्हता, जातीचे प्रमाणपत्र व अनुभवाबाबतच्या आवश्यक त्या मुळ प्रती उदा. गुणपत्रिका (मार्कशिट), सर्टिफिकेट, फोटो, इतर सादर करणे बंधनकारक आहे.

९) निवड केलेल्या उमेदवारांना म.न.पा. ने ठरवून दिलेल्या अटी शर्तीनुसार कामकाज करणे बंधनकारक राहिल. त्याप्रमाणे काम करणेस नकार दिलेस नेमणुक रद्द करणेत येईल.

१०) सदर पदांना महाराष्ट्र आरक्षण कायदा २००४ नुसार मागासवर्गीयांचे आरक्षण लागू राहिल. आरक्षणानुसार उमेदवार उपलब्ध न झालेस सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारांची नेमणुक करणेत येईल.

**मुख्य अटी खालील प्रमाणे राहतील.**

- स्थानिक उमेदवारांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.
- उमेदवारांना प्राणीसंग्रहालयाच्या कामकाजाच्या वेळा पाळणे बंधनकारक राहील, त्यामध्ये कोणतीही सवलत मिळणार नाही.
- उमेदवारांची नेमणुक झालेनंतर बायोमेट्रिक पध्दतीने हजेरी नोंदविणे बंधनकारक राहील व हजेरी मस्टरवर रोजचे रोज स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्याशिवाय पगार अदा केला जाणार नाही.
- सदर पदासाठी उमेदवारांना वयाची अट लागु राहणार नाही.

**अर्ज करण्याची अंतिम दिनांक :** दि. १४/५/२०१८ कार्यालयीन वेळेपर्यंत.
**अर्ज छाननी होऊन पात्र उमेदवारांची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध होण्याचा दिनांक :** दि. १६/५/२०१८
**मुलाखतीचे दिनांक व ठिकाण :** गुरुवार दिनांक १७/०५/२०१८ रोजी सकाळी ११:०० वा.
मा. आयुक्त कक्ष, ४ था मजला, पिं.चिं.म.न.पा. पिंपरी, पुणे- १८

जाहिरात क्र. - १२६७
रोटेशन क्र.- ब-३
वेबसाईट - www.pcmcindia.gov.in
क्र. पवै/ ०१ /कावि/१३१/२०१८
दि.०५/ ०५/२०१८

सही/-
अति. आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८